# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**
**बोर्ड क्र. २९ ते ३२ (एकुण-०४)**
**व्दितीय अपील क्रमांक :- १०५९, १०६०, १०६१ व १०६३ / २०२३**

श्री.संजय कारभारी कुटे, **अपिलार्थी**
रा.बेलतगव्हाण कुटे मळा, ता.जि.नाशिक

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी** **उत्तरवादी क्र.१**

| बोर्ड क्र. | जन माहिती अधिकारी तथा |
|---|---|
| २९, ३०, ३१, | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, नाशिक |
| ३२ | सहायक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, पंचायत समिती, नाशिक |

**प्रथम अपिलीय अधिकारी,** **उत्तरवादी क्र.२**

| बोर्ड क्र. | प्रथम अपिलीय अधिकारी, तथा |
|---|---|
| २९, ३०, ३१, ३२ | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक |

**(सुनावणी दि.०४/०८/२०२६)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये एकुण ०४ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. त्यानुसार सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आलेले आहे. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा तथा विस्तार अधिकारी (पं) यांचे प्रतिनिधी, श्री.संजय पोपट बच्छाव, क.सहा., जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, श्री.प्रकाश शिवाजी थेटे, प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.एम.बी. चव्हाण, क.सहा. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र - अ नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| २९ | २३.०९.२०२२ | ग्रामसेवक श्री.आर.डी.महाले यांना पत्र क्र.पंसना/ग्राप/प्रशासन/३९४, दि.१८.०७.२०२२ रोजी कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे, त्या नोटीसवर आर.डी.महाले यांनी काय अहवाल सादर केला आहे, त्याची लेखी स्वरुपात |

| | | |
|---|---|---|
| | | माहिती मिळावी व गेल्या ३ महिन्यापासुन काय अहवाल सादर केला त्या अहवालाच्या सत्य झेरॉक्स प्रति मिळाव्या व अहवाल सादर केला नसेल तर आपण त्यांच्यावर काय प्रशासकीय कारवाई केली त्याची लेखी स्वरुपात माहिती मिळावी व अहवाल सादर केला असेल तर झेरॉक्स प्रती मिळाव्या व अहवाल सादर करण्यासाठी किती कारणे दाखवा नोटीस दिल्या जातात, शासन जीआर प्रमाणे किती कालावधीत अहवाल सादर केला जातो व किती मुदतीत सादर केला जातो त्याची लेखी स्वरुपात माहिती, |
| ३० | १०.१०.२०२२ | सोनवणे साहेब व सानप साहेब विस्तार अधिकारी ग्रा.पं. विभाग यांनी नाशिक तालुक्याचा चार्ज घेतल्यापासुन त्यांच्याकडे किती तक्रारी अर्ज आलेले आहे त्या अर्जाचे अर्ज केलेल्या तक्रारदाराचे फक्त नावे मिळावे, तसेच संजय कारभारी कुटे यांनी दि.१२.०९.२०२२ रोजी तक्रार अर्ज गट विकास अधिकारी यांच्या कार्यालयात दिलेला आहे, त्या अर्जावर गेल्या १ महिन्यापासुन काय चौकशी केली व अर्जदार यांना काय पत्रव्यवहार केला त्याची लेखी स्वरुपात माहिती, चार्ज घेतल्यापासुन, |
| ३१ | २३.०९.२०२२ | गट विकास अधिकारी पं.स. नाशिक यांनी पत्र क्र.पंसना/ग्राप/प्रशासन/ ४२६ / ४५१, दि.१३.०९.२०२२ रोजी सहायक गट विकास अधिकारी श्री.विनोद अण्णासाहेब मेढे यांना चौकशी कामी हे पत्र दिलेले आहे, या पत्रावर आजपावेतो काय चौकशी झाली, त्याची लेखी स्वरुपात माहिती मिळावी व अर्जदार यांना चौकशी कामी काय पत्रव्यवहार करण्यात आला व अर्जदार यांचा काय जबाब घेण्यात आला त्याची लेखी स्वरुपात माहिती व बेलतगव्हाण येथील सरपंच अतिक्रमण नोंदवहीवर स्वाक्षरी करत नाही त्यांच्यावर काय प्रशासकीय कारवाई करण्यात आली त्याची लेखी स्वरुपात माहिती, |
| ३२ | १०.१०.२०२२ | गट विकास अधिकारी पंचायत समिती नाशिक डॉ.सारिका बारी यांनी पं.स येथे चार्ज घेतल्यापासुन किती तक्रारी अर्ज आलेले आहे, ग्रा.पं. विभागात ग्रा.पं.तीचे नाशिक तालुक्यातील चौकशीकामी त्यातील किती ग्रा.पं.तीची चौकशी झालेली आहे, त्याची लेखी स्वरुपात माहिती व त्या बारी मॅडम यांनी चौकशी केलेल्या ग्रा.पं.तीची नावे मिळावे व त्या तक्रारी अर्ज आलेल्या त्या तक्रारदाराचे फक्त नावे मिळावो व त्या गावाचे ग्रा.पं.तीचे नावे मिळावे, तसेच सहायक गट विकास अधिकारी श्री.विनोद अण्णासाहेब मेढे यांनी चार्ज घेतल्यापासुन किती नाशिक तालुक्यातील तक्रारी अर्जावर किती ग्रा.पं.तीची तपासणी व चौकशी केलेली आहे त्या तक्रारी अर्जाच्या तक्रारदाराचे नावे मिळावे व ग्रा.पं.तीची नावे मिळावे, |

२. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

३. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या तीनही माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि.२१.१०.२०२२, दि.०४.११.२०२२ व

दि.२१.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व माहितीसंदर्भात वस्तुस्थिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. सदर माहिती वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळावी, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत केली असल्याचे दिसुन येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. सदर माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी सदर माहिती / वस्तुस्थिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त नमूद एकूण ०४ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(प्रकाश इंदलकर)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक.

**जावक क्र.** ८८८२ **दिनांक :** 09/08/2026